*International Journal of Commerce and Management Studies (IJCAMS)*
*Peer Reviewed, Indexed Journal, ISSN 2456-3684*
*Vol.8, No.1, 2023, www.ijcams.com*

# महाराष्ट्र शासन पुरस्कृत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचे विकासात्मक अध्ययन

**अनिकेत विनोदराव ठाकरे**
**संशोधन कर्ता**

**डॉ. लालचंद बोदिले**
**सहयोगी प्राध्यापक,**
**महात्मा ज्योतिबा फुले वाणिज्य, विज्ञान व विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय, भातकुली.**

## सारांश

महाराष्ट्र शासन पुरस्कृत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या अभ्यासाअंती असे दिसून येते की या योजनेच्या अनुदानाच्या रकमेमध्ये जास्त वाढ झालेली नाही त्याचप्रमाणे लाभार्थ्यांची संख्या सुद्धा वाढताना दिसून येते. शेतकरी कुटुंबातील शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर निराधार कुटुंबाला जगण्याकरिता या अनुदानाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. काळानुसार या योजनेच्या अटी शर्तीमध्ये बदल सुद्धा होताना दिसून येते. व या योजनेमुळे लाभार्थ्यांच्या जीवनमानात बदल होत असल्याचे दिसून येत आहे

मुख्य शब्द: महाराष्ट्र शासन, गोपीनाथ मुंडे, शेतकरी अपघात विमा योजनेचे ,विकासात्मक

## प्रस्तावना –

महाराष्ट्र हे प्रामुख्याने एक विकसनशील कृषी प्रधान राज्य म्हणून संपूर्ण भारतामध्ये ख्याती आहे. महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये विविध प्रकारची शेती केल्या जाते. महाराष्ट्रामध्ये शेतकरी ग्रामीण भागामध्ये अधिवास करताना आपल्याला दिसत आहे. ग्रामीण भागामधील जास्तीत जास्त जनता ही शेती व्यवसायावर व त्याचबरोबर शेती पूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. मागील काही वर्षांमध्ये नैसर्गिक वातावरणामध्ये खूप मोठे बदल घडून आले असल्याचे दिसून येत आहे. त्यामध्ये महापूर, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ व इतर नैसर्गिक संकटे यासारख्या नैसर्गिक आपत्तीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होऊन त्यास इतर समस्यांना सुद्धा तोंड द्यावे लागत आहे. त्याचबरोबर सामान्यता शेतकऱ्यांच्या कुटुंबामध्ये शेतकरी हा एकमेव कमावणारा व्यक्ती असतो म्हणून त्याच्या संकटात अजूनच जास्त वाढ होते. महाराष्ट्रामध्ये खूप मोठा वर्ग हा दारिद्र्यरेषेचा खाली येतो म्हणून दारिद्र रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांचे सुद्धा प्रमाण अधिक आहे आणि हे सर्व दारिद्र्यरेषेखाली लोक प्रत्यक्ष व प्रत्यक्षरीत्या शेतीवर अवलंबून आहेत.

नैसर्गिक कारणांमुळे किंवा शेतकऱ्यांच्या वैयक्तिक समस्येमुळे कुटुंबातील प्रमुख व्यक्तीचे निधन झाल्यानंतर ते कुटुंब निराधार होते. त्याचप्रमाणे ग्रामीण भागामध्ये

लहान मुलांमध्ये कुपोषण, महिला व पुरुष वर्गामध्ये अंधश्रद्धा, उत्पन्न जास्त नसल्यामुळे आलेली गरिबी व दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या जास्त असल्यामुळे दरिद्री ही भरपूर लोकांच्या वाट्याला आलेली आहे. ही एक फार मोठी समस्या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबामध्ये दिसून येते.

## संशोधनाचे उद्देश -

१) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा अभ्यास करणे

२) या योजनेसाठी तयार करण्यात आलेल्या शासकीय यंत्रणेचा अभ्यास करणे

३) योजनेच्या पात्रतेचा निकष व अटी शर्ती यांचा अभ्यास करणे

४) लाभार्थींच्या मुलाखती घेऊन योजनेविषयी त्यांचे मनोगत जाणून घेणे.

## संशोधन साहित्याचा आढावा -

**१) सुंदर आणि लथिया रामकृष्णन (२०१८) -** शेतकरी पिक विमा योजनेविषयी जागरूकता, समज आणि पीक विमा कार्याविषयी मानसिकता या विषयावर संशोधन केले या संशोधनामध्ये असे आढळून आले की बरेच शेतकरी पिक विमा काढतात त्याचप्रमाणे काही शेतकऱ्यांना या योजनेविषयी पूर्ण माहिती नाही त्याचप्रमाणे सरकारची नियम व अटी काही शेतकरी पूर्ण करू शकत नाही त्यामुळे त्यांना योजनेपासून वंचित रहावे लागतें.

**२) राजू यश आणि चंद (२००८) -** भारतातील कृषी विमा समस्या आणि संभावना या पुस्तकांमध्ये त्यांनी पीक विमा योजनेबद्दल विस्तृत विवेचन केले आहे. त्यांनी या पुस्तकांमध्ये शेतकऱ्यांना मिळणारे आर्थिक संरक्षण हा सर्वात महत्त्वाचा घटक असल्याचे नमूद केले आहे.

**३) गायकवाड ज्योती (२०१७) -** गायकवाड ज्योती यांच्या मते कृषी विकासासाठी सरकारकडून विविध कृषी विकास योजना राबवल्या जातात या योजनांचा कृषी विकासामध्ये मोठा वाटा आहे. या विविध कृषी विकास योजनांमध्ये पिक विमा योजना, शेततळे धडक कार्यक्रम, कृषी विस्तार योजना, शाश्वत शेती विकास कार्यक्रम. या योजनांचा समावेश होतो कृषी क्षेत्रासाठीच्या पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबांना आर्थिक लाभ मिळतो.

**४) गुजर तृप्ती (२०१९) -** यांनी असे मत मांडले की राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास या पिक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे व नवीन तंत्रज्ञान वापरासाठी त्यांना प्रोत्साहित करणे हे या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहे.

**५) चव्हाण राजश्री (२००८) -** राजश्री यांनी असे मत मांडले की कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे असे म्हटले जाते मात्र कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमधील कृषी तंत्रज्ञानाचा अभाव, अल्प उत्पादकता, रोजगारांचा अभाव, पिकांची विविधता, जमिनीचे आसमान वितरण, लहान शेतकऱ्यांचे मोठे प्रमाण हे वैशिष्ट्य आहेत. कृषी उत्पादनातील अनिश्चित निर्माण होण्यासाठी अनेक कारणे आहेत यामध्ये हवामानामध्ये सातत्याने होणारे बदल, कीड,

रोगराई आज आदानांचा पुरवठा आणि बाजारपेठेतील धोके इत्यादीमुळे कृषी क्षेत्रात निर्माण होणारी अनिच्छितता शेतकऱ्यांसाठी नवीन नाही ही आणि अनिच्छितता कमी करण्यासाठी पीक विमा योजना महत्वपूर्ण ठरते

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने मासिके, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, शासनाचे विविध अहवाल, शासन निर्णय वृत्तपत्रे व इंटरनेटवरील माहिति इत्यादी साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

## **संशोधनाच्या मर्यादा** –

महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविते व त्या माध्यमातून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्याचा प्रयत्न करते.परंतु सदर शोध निबंधामध्ये इतर महाराष्ट्र शासनाच्या योजनांचा विचार न करता संशोधकाच्या संशोधनाच्या मर्यादा लक्षात घेता वरील योजनेचा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अभ्यास केलेला आहे.

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना -**

या योजनेमध्ये शेती व्यवसाय करताना व नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात उदाहरणार्थ रस्त्यावरील अपघात, वीज पडणे, विजेचा शॉक बसणे, पूर, सर्पदंश व वाहन अपघात तसेच अन्य कोणताही अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना मृत्यू येतो किंवा त्यांना अपंगत्व येते घरातील कर्त्या व्यक्तीचा झालेला अपघातामुळे कुटुंबाचे नुकसान होऊन उत्पन्नाचे साधन बंद होते आणि अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबास आर्थिक लाभ घेण्याकरिता कोणतेही स्वतंत्र विमा योजना कार्यान्वीत नव्हती त्यामुळे महाराष्ट्र शासनाने १९ ऑगस्ट २००४ रोजी शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्रामध्ये शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना कार्यान्वित केली. त्यानंतर या योजनेच्या कार्यपद्धती अटी व शर्ती यामध्ये बदल न करता सदर योजनेचे नाव बदलून सन २००९-१० पासून शेतकरी जनता अपघात विमा योजना असे नाव ठेवण्यात आले व तोपर्यंत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास, अपघातामुळे दोन्ही डोळे निकामी झाल्यास, अपघातामुळे दोन अवयव निकामी झाल्यास व अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी झाल्यास, रुपये (१,००,०००) एक लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून व अपघातामुळे एक डोळा निकामी झाल्यास, अपघातामुळे एक अवयव निकामी झाल्यास रुपये (५०,०००) पन्नास हजार नुकसान भरपाई ही शेतकऱ्याला विमा कंपनीकडून मिळत होती

या योजनेची कल्याणकारी स्वरूप विचारात घेऊन सन २०१५-१६ या वर्षापासून योजनेचे नाव बदलून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजने असे करण्यात आले व शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास, अपघातामुळे दोन्ही डोळे निकामी झाल्यास, अपघातामुळे दोन अवयव निकामी झाल्यास व अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी झाल्यास, रुपये (२,००,०००) दोन लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून व

अपघातामुळे एक डोळा निकामी झाल्यास, अपघातामुळे एक अवयव निकामी झाल्यास रुपये (१,००,०००) एक लाख नुकसान भरपाई ही शेतकऱ्याला विमा कंपनीकडून मिळत आहे.

**महाराष्ट्र शासन पुरस्कृत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा विकास -**

महाराष्ट्र शासनाद्वारे ही योजना १० ते ७५ या वयोगटांतील शेतकऱ्यांसाठी राबविल्या जात आहे. ही योजना महाराष्ट्र शासनाने सर्वप्रथम २००४ मध्ये सुरू केली होती. या योजनेअंतर्गत २००४ पासून २०२२ पर्यंत च्या वेगवेगळ्या शासन निर्णयांच्या अभ्यास केल्यानंतर असे आढळून येते की महाराष्ट्र शासनाने या योजनेचा अनुदानावरच्या रकमेमध्ये जास्त वाढ केलेली दिसून येत नाही. त्याच पद्धतीने २००४ पासून आतापर्यंत वेगवेगळ्या अहवालावरून असे दिसून येते की महाराष्ट्रातील अपघात ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला या योजनेचा लाभ होताना दिसत आहे. यावरून असे लक्षात येते की शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झालास त्यांच्या कुटुंबाला आत्मसन्मानाने जगण्यासाठी तसेच दैनंदिन गरजा व आजारपण अशा घटकांवर खर्च करण्याकरता महाराष्ट्र शासनामार्फत हे अनुदान दिल्या जाते त्यामध्ये महागाईनुसार जास्त वाढ झालेली दिसून येत नाही आहे. या योजनेच्या अटी, पात्रता जाचक असल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना या योजनेच्या मार्फत अनुदान खऱ्या अर्थाने लवकर पोहोचत नाही.

## निष्कर्ष -

१) महाराष्ट्र शासन पुरस्कृत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या अनुदाना रकमेमध्ये जास्त वाढ झालेली दिसून येत नाही आहे.

२) या योजनेच्या लाभार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ होताना दिसून येत आहे.

३) या योजनेच्या पात्रता अटी व शर्ती यामध्ये शीथीलता झाल्याची दिसते.

४) अपंगत्व आल्यास लाभार्थ्यांना व मृत्यू आल्यास त्याच्या कुटुंबांना आर्थिक मदतीचा लाभ झाल्याचा दिसून येतो.

५) महाराष्ट्र शासनाला या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभाची रक्कम वाढविण्याची आवश्यकता आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची -

१) डॉ. भंडारकर पू.ल. सामाजिक संशोधन पद्धती, विलास अंधारे संचालक, सचिव मा. विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर - ९३

२) शासन निर्णय, कृषी व पद्युम विभाग, गोमुशेअवि/ प्र. क्र. ३२/ ११ अे, दिनांक ०८.०३.२०२१

३) माहिती पुस्तिका - कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यसाय विभाग.

४) www. amravati.gov.in.''